# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१**

**Tel.-22665233 Fax.-22661239 Email-rdcmumbaicity@gmail.com**


क्रमांक - रवका/टे-३/ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक वापर/२०१८

दिनांक - 12 FEB 2018

**वाचले :** १. शासन, पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/ता.क.१, दिनांक २२.०८.२०१७
२. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र.१७३/२०१० दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेले आदेश /निकालपत्र
३. पोलीस उपआयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांचे दि.०८.०२.२०१८ चे पत्र
४. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे ई-मेलव्दारे प्राप्त अभिप्राय
५. अध्यक्ष, बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समितीचे यांचे दि.०३.०२.२०१८ चे ई-मेलव्दारे प्राप्त पत्र

**आदेश :**

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५ (२) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी (रात्री १० वा. पासून सकाळी ६ वाजेपर्यंत) करता येत नाही. या नियमामध्ये दि.११.१०.२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्र शासनाने सुधारणा केली असून नियम ५ मध्ये उपनियम (३) चा नव्याने समावेश करण्यात आलेला होता. त्याअन्वये ध्वनी प्रदुषणाची पातळी विहित मर्यादेत राखून वर्षभरामध्ये १५ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी रात्री १० वाजेपर्यंत ऐवजी रात्री १२ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक सणांकरिता करता येत होता. तसेच या अनुषंगाने जनहित याचिका क्र.१७३/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरासाठी राज्य शासनाने निश्चित केलेल्या वर्षभरातील १५ दिवसांसाठी वेळेत सूट देण्यात आली होती.

आता केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक दि.१०.०८.२०१७ रोजी ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ सुधारित अधिसूचना निर्गमित केलेली असून सदर अधिसूचनेन्वये नियम ३ मध्ये उपनियम (५) व नियम ५ मध्ये उपनियम (३) मध्ये सुधारणा केली आहे. आता नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर वर्षातील एकुण १५ दिवसांसाठी (श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत करण्याकरिता वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी राज्य शासनाव्दारे शासन, पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१, दिनांक २२.०८.२०१७ अन्वये संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

सबब शासन निर्णय दि.२२.०८.२०१७ नुसार पोलीस विभाग व ध्वनी प्राधिकरण यांचे अभिप्राय संदर्भीय क्र.३ व ४ अन्वये प्राप्त असून सन २०१८ यावर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांच्या वापराबाबत (श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांच्या वापराबाबत शासन निर्णय दि.२२.०८.२०१८ व्दारे मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा सन २०१८ मधील खालील तक्त्यात नमुद १५ दिवसापैकी खालीलप्रमाणे १३ दिवस निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | उत्सवाचे नाव | दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | शिवजयंती | १९.०२.२०१८ | सोमवार | सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४.०४.२०१८ | शनिवार | |
| ३ | महाराष्ट्र दिन | ०१.०५.२०१८ | मंगळवार | |
| ४ | गणेशोत्सव - (दुसरा दिवस) | १४.०९.२०१८ | शुक्रवार | |
| | (पाचवा दिवस व गौरी विसर्जन) | १७.०९.२०१८ | सोमवार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (दहावा दिवस) | २२.०९.२०१८ | शनिवार | सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत |
| | (अनंत चतुर्दशी) | २३.०९.२०१८ | रविवार | |
| ५ | नवरात्रोत्सव -(अष्टमी) (नवमी) | १७.१०.२०१८ १८.१०.२०१८ | बुधवार गुरुवार | |
| ६ | दिवाळी - लक्ष्मीपूजन | ०७.११.२०१८ | बुधवार | |
| ७ | ईद - ए - मिलाद | २१.११.२०१८ | बुधवार | |
| ८ | ख्रिसमस | २४.१२.२०१८ | सोमवार | |
| ९ | ३१ डिसेंबर | ३१.१२.२०१८ | सोमवार | |
| १० | उर्वरित २ दिवस | परवानगी पोलीस विभागाशी सल्लामसलत करुन महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार दिली जाईल. | | |

उपरोक्त तक्त्यात नमूद दिनांकास मुंबई शहर जिल्हयात ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापर ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मध्ये नमूद ध्वनीची विहीद मर्यादा राखणेच्या अटींवर सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट खालील अटींच्या अधिन राहून देणेत येत आहे.

(१) मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनी प्रदुषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे व मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

(२) ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबतच्या उपरोक्त सूट ही राज्य शासनामार्फत घोषित शांतता क्षेत्रात लागू होणार नाही.

(३) ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबतच्या उपरोक्त सूटीच्या कालावधीत ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ चे पालन करण्यात यावे.

(४) ध्वनी प्रदूषण नियम, २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर मा. उच्च न्यायालयाने दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पध्दतीने कार्यवाही करावी. तसेच प्राधिकरणाने निदर्शास आणून दिलेल्या बाबींवर प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम १९ (अ) नुसार कार्यवाही करावी.

(५) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अधिसूचनेत घालून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे व तरतूदींचे उल्लंघन होणार नाही व त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना ध्वनी प्राधिकरणाने कराव्यात.

सदर आदेश या कार्यालयाचे www.mumbaicity.gov.in या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करणेत आलेला आहे.

Collector Mumbai City

(संपदा मेहता)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :

१. मा. संचालक (पर्यावरण), पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय
३. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय
४. पोलीस उपआयुक्त (अभियान), मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई
५. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रामकर चेंबर, २१६, ई-विंग, २ रा मजला,जैन मंदिराजवळ, देवनार गाव रोड, गोंवडी (पुर्व), मुंबई-४०० ०८८
६. ॲड श्री. नरेश दहिबावकर, अध्यक्ष, बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती, वीर श्रीकांत हरकर मार्ग, शहीद भगतसिंग मैदानासमोर, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-४०० ०३३
७. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी (NIC), मुंबई शहर यांना संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्दीसाठी